शोध पत्र

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयामधील प्रशिक्षणार्थ्यांचे सराव अध्यापनातील व्यवस्थापन कौशल्य : एक अभ्यास

September, 2011

* प्रा. डॉ. गोरोबा खरपे

* अभिनव अध्यापक महाविद्यालय, लातूर ( महाराष्ट्र )

**प्रास्ताविक :**

शिक्षणामध्ये सद्यस्थितीत बालककेंद्री शिक्षण पध्दतीचा स्वीकार करुन व्यक्तीच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने शिक्षणाचे स्वरूप ठरविले आहे. परंतु विद्यार्थ्यांच्या डोक्यात केवळ माहिती कोंबणे व गुणप्राप्तीच्या शर्यतीत त्याला ढकलणे योग्य नव्हे. शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाचा विचार केला गेला तरच शिक्षण प्रक्रियेला अर्थ उरतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात शिक्षकाची भूमिका ही फार महत्त्वाची आहे. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षण घडविताना प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन संदर्भातील व्यवस्थापन कौशल्याचा विचार होणे अधिक गरजेचे आहे. ज्या-ज्या शिक्षकांना वर्ग व्यवस्थापन अधिक जमले त्यांच्या अध्यापनाची फलनिष्पती अधिक दिसून येते. “संघटित प्रयत्नांच्या मुळाशी असलेली मूलभूत, एकात्मिक व चलित रचना म्हणजे व्यवस्थापन होय.” - मॅकफरलँड

शैक्षणिक स्तरावरील व्यवस्थापनात नियोजन, नियंत्रण, निर्देशन, निर्णय, मूल्यमापन, नेतृत्त्व, कार्यवाही अशा अनेक घटकांचा समावेश होतो. ठरविलेली योजना पूर्णपणे व्यवस्थित पार पाडण्यासाठी नियोजनाची आवश्यकता असते. परंतु ठरविलेल्या योजनेपेक्षा कांही वेगळया स्वरुपाचे कार्य होऊ लागले तर त्यात सुधारणा करण्यासाठी निर्देशनाची गरज असते. तसेच तयार केलेल्या योजनेप्रमाणे कार्याची अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहणे व योजनेप्रमाणे करुन घेणे म्हणजे नियंत्रण होय. या सर्व बाबींची गरज प्रशिक्षणार्थ्यांना सराव अध्यापनाकरिता आवश्यक असते.कारण सराव अध्यापनातील व्यवस्थापन कौशल्य आत्मसात केलेला चांगला शिक्षकच खालील प्रमाणे अध्यापन करील-

“A good teacher teaches on the line, between the line and beyond the line.”

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. प्रशिक्षणार्थ्यांच्या सराव अध्यापनातील व्यवस्थापन कौशल्यांचा अभ्यास करणे. २. प्रशिक्षणार्थ्यांना सराव अध्यापनादरम्यान येणाऱ्या व्यवस्थापन विषयक समस्यांचा अभ्यास करणे. ३. प्रशिक्षणार्थ्यांना सराव अध्यापनादरम्यान येणाऱ्या व्यवस्थापन विषयक समस्यावर उपाय सुचविणे.

**संशोधनाची गृहितके :**

१. प्रशिक्षणार्थ्यांमध्ये सराव अध्यापनातील व्यवस्थापन विषयक कौशल्य कमी-अधिक प्रमाणात असते. २. प्रशिक्षणार्थ्यांच्या सराव अध्यापनातील व्यवस्थापन कौशल्याचा सराव अध्यापनावर परिणाम होतो. ३. प्रशिक्षणार्थ्यांना सराव अध्यापनातील व्यवस्थापन कौशल्य विषयक समस्या येतात.

**संशाधनाची व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सर्व विषयाच्या अध्यापन पध्दतीच्या प्रशिक्षणार्थ्यांच्या सराव अध्यापनापुरते व्याप्त आहे.प्रस्तुत संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या नियोजन, नियंत्रण, निर्देशन या तीन अध्यापन कौशल्यापुरतेच मर्यादित आहे.

**संशोधनाची गरज व महत्त्व :**

प्रशिक्षणार्थी सराव अध्यापन करीत असताना त्यांचे वर्ग व्यवस्थापन कसे आहे? हे निरीक्षक पहात असतात व त्यांना सूचना करतात. प्रशिक्षणार्थी सराव अध्यापनाचे नियोजनानुसार अंमलबजावणी करतो का? वर्ग नियंत्रण कसे करतो? सराव अध्यापनादरम्यान विविध प्रकारचे निर्देशन कसे करतो? विविध क्लूप्त्यांचा वापर कशा प्रकारे करतो? शैक्षणिक साधने कशी हाताळतो? प्रश्न कशा प्रकारचे व कसे विचारतो? फलक लेखन नियोजनानुसार करतो का? अशा विविध बाबी पाहण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे. प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्यक्ष सराव अध्यापन करताना अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. त्यामध्ये त्यांना एक व्यवस्थापक म्हणून जे कार्य करावे लागते ते कार्य प्रशिक्षणार्थी किती योग्य प्रकारे करु शकतात? वर्गाचे नियंत्रण व अध्यापन कृतींचे यश हे व्यवस्थानावर अवलंबून असते. सुव्यवस्थित नियोजनावरच सराव अध्यापन परिणामकारक होते. प्रशिक्षणार्थ्यांनी केलेल्या विविध प्रकारच्या निर्देशनाचा परिणाम वर्गाध्यापनावर कसा पडतो? याचा अभ्यास करुन आलेल्या समस्यांवर उपाय सुचविण्याकरिता प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व आहे.

**संशोधन पध्दती :**

संशोधकाने संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा घेतला. तसेच प्रस्तुत संशोधन हे शालेय क्षेत्रातील वर्तमान स्थितीचा आढावा घेणारे आहे म्हणून संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीची निवड केलेली आहे.

**संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनात निरीक्षण हे संशोधन साधन म्हणून वापरण्यात आलेले आहे त्यात माहितीचे संकलन करण्यासाठी पंचबिंदू पदनिश्चयन श्रेणी वापरलेली आहे. सराव अध्यापनातील नियोजन, नियंत्रण आणि निर्देशन या तीन प्रमुख कौशल्यांचा व त्यांच्या उपघटकांचा अंतर्भाव पंचबिंदू पदनिश्चयन श्रेणीत करण्यात आलेला आहे.

**नमुना निवड पध्दती :**

प्रस्तुत संशोधनात अभिनव अध्यापक महाविद्यालयातील २०० प्रशिक्षणार्थ्यांपैकी सहेतूक नमुना निवड पध्दतीने आठ अध्यापन पध्दतीतील प्रत्येकी ०५ या प्रमाणे ४० प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष :**

१. प्रस्तावना पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थी पाठयांशाची निवड, शैक्षणिक साधनांचे नियाजन, फलक लेखन आणि वेळेचे व्यवस्थापन मध्यम स्वरुपाचे करतात.

२. प्रस्तावना पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थ्यांचे वर्ग नियंत्रण सरासरीपेक्षा कमी दर्जाचे आहे.

३. प्रस्तावना पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थ्यांचे प्रश्न विचारण्याचे कौशल्य व विद्यार्थ्यांचा सहभाग चांगला आहे.

४. विषय प्रतिपादन पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थ्यांचे शैक्षणिक साधनांचे नियोजन, फलक लेखन व वेळेचे व्यवस्थापन मध्यम स्वरुपाचे आहे.

५. विषय प्रतिपादन पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थ्यांचे प्रश्न कौशल्य विद्यार्थी सहभाग चांगला आहे मात्र प्रशिक्षणार्थ्यांची चेतक बदल करण्याची क्षमता साधारण प्रतीची आहे.

६. विषय प्रतिपादन पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थ्यांत विद्यार्थ्यांच्या शंका निवारण करण्याची क्षमता सरासरीपेक्षा कमी प्रतीची आहे.

७. संकलन पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थी शैक्षणिक साधने वापरत नाहीत आणि फलक लेखनही करीत नाहीत.

८. संकलन पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थ्यांना विद्यार्थ्यांचा शाब्दिक सहभाग सरासरीपेक्षा अधिक चांगला आहे परंतु विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग कमी आहे.

९. संकलन पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकेचे निवारण सरासरीपेक्षा कमी करतात आणि वर्ग नियंत्रण ही निकृष्ट प्रतीचे करतात.

१०.उपयोजन पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थी शैक्षणिक साधनांचा वापर करत नाहीत आणि फलक लेखन हे मध्यम स्वरुपाचे करतात..

११.उपयोजन पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थ्यांनी निर्देशन कौशल्य चांगल्या प्रकारे अवगत केलेले दिसून येते.

१२.उपयोजन पायरीत बहुतांश प्रशिक्षणार्थी शंकेचे निवारण चांगल्याप्रकारे करतात मात्र वर्ग नियंत्रण कमी असते.

१३.गृहपाठ पायरीत प्रशिक्षणार्थ्यांनी दिलेल्या गृहपाठ प्रश्नांचा दर्जा मध्यम स्वरुपाचा आहे आणि पाठाच्या वेळेचे नियोजन ही मध्यम स्वरुपाचे आहे.

**उपाययोजना/शिफारशी :**

१. प्रशिक्षणार्थ्यांचे नियोजन, नियंत्रण व निर्देशन कौशल्ये उत्तम पातळीपर्यंत पोहचविण्यासाठी त्यांना व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून द्यावे.

२. प्रशिक्षणार्थ्यांचे सराव अध्यापनात वर्ग नियंत्रणाचे प्रश्न उद्‌भवतात त्यासाठी त्यांनी आपल्या आशयावर प्रभूत्त्व संपादन करावे.

३. शैक्षणिक साधनांचा वापर करताना प्रभावी साधनांच्या निकषाविषयी माहिती पटवून द्यावी म्हणजे त्याचा वापर अध्यापनात योग्य प्रकारे करतील.

४. विद्यार्थ्यांच्या शंका निवारण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांनी अध्यापन पाठयांशाचा व इतर संबंधित विषयांचा सखोल अभ्यास करावा.

५. चेतक बदल करण्याची क्षमता उत्तम प्रतीची होण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांनी नवनवीन क्लुप्त्यांचा वापर करावा.

६. सूक्ष्म पाठादरम्यान प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या अध्यापनाचे व्हिडीओ रेकॉरडींग करुन दाखवावे त्यामुळे त्यांना स्वतःच्या अध्यापनातील चूका कळतील.

७. प्रशिक्षणार्थ्यांने शैक्षणिक साधने आपल्या अध्यापनात जास्तीत जास्त वापरावीत यासाठी त्यांना शैक्षणिक साधनाच्या वापराची उपयुक्तता स्पष्ट करुन द्यावी.

८. शैक्षणिक साहित्याच्या वापरामुळे अध्यापन प्रभावी होते, विद्यार्थ्यांच्या संकल्पना अधिक स्पष्ट होतात आणि वर्ग नियंत्रणाची ही बराच प्रश्न सुटतो हे प्रशिक्षणार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे.

९. फलक लेखनातील बारकावे प्रशिक्षणार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावेत. परिस्थितीनुरुप फलकाचे नियोजन व लेखन करावे.

१०.प्रशिक्षणार्थ्यांनी गृहपाठाचे प्रश्न विद्यार्थी वयोगट पाहून, विषयानुषंगे आणि अध्यापन घटकाला व्याप्त असे द्यावेत तसेच अध्यापन करताना वेळेच्या नियोजनाकडेही लक्ष द्यावे.

११.सराव अध्यापन हे नियोजनानुसार व्यवस्थापन कौशल्याचा वापर करुन घेत असताना समयसूचकतेने काही निर्णय व आवश्यक बद्दल हे त्या-त्या परिस्थितीनुरुप घ्यावे. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांचे सराव अध्यापनातील व्यवस्थापन उत्कृष्ट हाईल.

## संदर्भ ग्रंथ

१. अकोलकर ग.वि., पाटणकर ना.वि., शालेय व्यवस्थापन आणि प्रशासन, पुणे, निलकंठ प्रकाशन. २. शिवणेकर ल.ना., अध्यापक भूमिका व कार्ये,पुणे, नूतन प्रकाशन.
३. देशमुख एल.जी., शैक्षणिक मानसशास्त्र व अध्यापनशास्त्र,कोल्हापूर, फडके प्रकाशन. ४. भिंताडे वि.रा., शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे, नित्य नूतन प्रकाशन. ५. डॉ.पारसनीस न.रा., शिक्षकांचे प्रशिक्षण, पुणे, नित्य नूतन प्रकाशन. ६. डॉ.जोशी शोभना, वर्गाध्यापनाच्या उद्दिष्टांचे मूल्यमापन, औरंगाबाद, मृण्मयी प्रकाशन. 7. **Purohit P.N., Methodology Of Educational Research, Jaipur, Mangal Deep Publications**